**ठळक बातम्या**

- अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी आणखी तेराशे कोटींच्या मदतीचा शासन निर्णय जारी

- नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत लोकार्पण

- डिजिटल अटकेच्या नावाखाली व्यावसायिकाचे ५८ कोटी रुपये लंपास करणाऱ्या तिघांना सायबर पोलिसांकडून अटक

**आणि**

- राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांचं निधन

**<><><><><>**

गेल्या महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी एक हजार ३५६ कोटी रुपयांची मदत मंजूर झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे. सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या जिल्हांमधल्या २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१ हेक्टरहून अधिक बाधित पिकांसाठी ही मदत मिळेल. यासाठीचा शासन निर्णय झाल्याचं त्यांनी पत्रकाद्वारे म्हटलं आहे.

या आपत्तीत मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना, ज्यांच्या पशुधनाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना जिल्हास्तरावरुन मदत दिली जाणार आहे. यामुळे त्या प्रकारातल्या मदतीचं वितरण ताबडतोब होईल, असंही मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आपद्ग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने भरघोस पॅकेजची घोषणा केली होती पण आज दिवाळीच्या तोंडावर फक्त अठराशे कोटींपर्यंतच्या मदतीचेच जीआर आले आहेत. राज्यसरकार हेक्टरी फक्त १० हजार रुपयांची मदत देत आहे, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. कृषी बाजार समित्यांवरच्या विद्यमान व्यवस्थापन मंडळाऐवजी पणन मंत्र्यांच्या हाती कृषी उत्पन्न बाजार समितीची सूत्रं देण्याच्या निर्णयावरही वडेट्टीवार यांनी यावेळी टीका केली.

**<><><><><>**

अतिवृष्टीची झळ बसलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं केलेली मदत तुटपुंजी असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही केली आहे. अतिवृष्टीमुळं हवालदिल झालेल्या शेतकरी वर्गाबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पक्षानं आज दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी बारामती वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात उड्डाण केलं. ओझरमधल्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्सच्या कारखान्यात हा कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी तेजस एमके वन ए या लढाऊ विमानाच्या उत्पादन साखळीचंही लोकार्पण केलं. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

**होल्ड - राजनाथ सिंग बाइट**

नाशिकमध्ये तयार झालेल्या सुखोई-३०, एलसीए आणि एचटीटी-४० विमानांच्या उड्डाणांचं राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं. हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं उड्डाण असल्याचं ते यावेळी म्हणाले. २०१४ पूर्वी जवळपास ६५ ते ७० टक्के

संरक्षण सामग्री आयात केली जात होती. मात्र आता जवळपास ६५ टक्के उत्पादनं देशात तयार होत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

हवाई दलातल्या सर्व अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दर्जा, व्यावसायिकता, सुरक्षा आणि कार्यक्षमता यासाठी कायम वचनबद्ध रहावं. त्यातूनच देशाच्या हवाई रक्षणासाठी भारतीय हवाई दल प्रभावीरित्या कार्यरत राहू शकेल, असं हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी आज सांगितलं. नागपुरात हवाई दलाच्या देखरेख विभागात आयोजित कमांडरांच्या परिषदेत ते बोलत होते. तांत्रिक क्षमतांचा देशांतर्गत विकास करणं या विषयावर ही दोन दिवसीय परिषद होती.

**<><><><><>**

डिजिटल अटकेच्या नावाखाली मुंबईतल्या एका व्यावसायिकाचे ५८ कोटी रुपये लंपास करणाऱ्या ३ आरोपींना सायबर पोलीसांनी अटक केली आहे. फसवणुकीच्या या प्रकारादरम्यान आरोपींनी संबंधित व्यावसायिकासह त्याच्या पत्नीला व्हिडीओ कॉलवरून धमकी दिली होती. धमकीच्या धाकामुळं या दाम्पत्यानं १९ ऑगस्ट ते ८ ऑक्टोबर दरम्यान आरोपींनी मागणी केलेले ५८ कोटी रुपये त्यांच्या खात्यात वर्ग केले होते. पण फसवणूक झाल्याचं लक्षात येताच या दाम्पत्यानं सायबर पोलीस विभागाकडे तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची दखल घेत सायबर पोलिसांनी आरोपींचा मग काढत त्यांना अटक केली. या आरोपींची कसून चौकशी सुरु असल्याचं सायबर विभागानं कळवलं आहे.

**<><><><><>**

डिजिटल अटक या सायबर गुन्ह्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत केंद्रीय अन्वेषण संस्थेकडून उत्तर मागितलं आहे. हरयाणातल्या अंबाला इथल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या तक्रारीनंतर सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली आहे. सायबर चोरांनी सर्वोच्च न्यायालयाच्या बनावट आदेशांचा वापर करून

आपल्याला डिजिटल अटकेत ठेवलं आणि एक कोटींहून अधिक रुपये उकळल्याचा आरोप या महिलेने केला होता. बनावट आदेशांचा वापर करून अशा प्रकारे होणारी आर्थिक फसवणूक न्यायव्यवस्थेवरच्या नागरिकांच्या विश्वासाला धक्का देणारी ठरू शकते, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे.

**<><><><>**

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज अल्पशा आजाराने निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. १९९५ मध्ये युती सरकारच्या काळात त्यांनी राज्यमंत्री म्हणूनही काम पाहिलं होतं. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते विद्यमान अध्यक्ष होते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या कर्डिले यांनी तरुण वयातच नेतृत्व गुण सिद्ध करून अपक्ष उमेदवारी करीत नगर तालुक्यातून आमदारकी मिळवली होती. नंतर राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप असा प्रवास करीत ते पाच वेळा विधानसभेवर निवडून गेले होते.

ज्येष्ठ नेते, राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डीले यांचं आकस्मिक निधन हे राहुरीसह, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आघात आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार शिवाजीराव कर्डीले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. कर्डिले हे जनतेच्या प्रश्नांसाठी तळमळीने काम करणारे ते खरे लोकसेवक होते. त्यांच्या कामामुळे राहुरी तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कर्डीले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<><><><>**

गुजरात सरकारच्या मंत्रिमंडळाचा आज विस्तार झाला. त्यात २१ मंत्र्यांनी शपथ घेतली. माजी गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी आज उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी गांधीनगरमध्ये आयोजित कार्यक्रमात नवीन मंत्र्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. आधीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री

असलेले प्रफुल्ल पानसेरिया यांना कॅबिनेट मंत्री पदी बढती मिळाली. क्रिकेटपटू रविंद्र जडेजा याची पत्नी रिवा बा यांनीही राज्यमंत्री पदाची शपथ घेतली. एकूण ५ कॅबिनेट मंत्री, ३ स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री आणि १२ राज्यमंत्र्यांचा आज शपथविधी झाला. यावेळी मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते. या शपथविधीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण मंत्रिमंडळानं काल राजीनामा दिला होता.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. त्यामुळं जवळपास संपूर्ण अबूजमाड आता नक्षलवाद्यांच्या प्रभावातून मुक्त झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये ११० महिला आणि ९८ पुरुष आहेत. त्यांनी १९ एके-४७ रायफली आणि १७ SLR रायफलींसह एकंदर १५३ शस्त्र पोलिसांकडे जमा केली.

**<><><><><>**

जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांच्या शासकीय निवासस्थानी दहा लाख रुपयांची लाच घेताना काल रात्री अटक केली. महानगरपालिकेच्या इमारतीच्या बांधकामाच्या पैशांची देयकं देण्यासाठी त्यांनी कंत्राटदाराकडे या लाचेची मागणी केली होती. दरम्यान या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे यांनी आकाशवाणीला दिली.

**//<><><><><>//**